# लोकाभिमुख उपक्रमांद्वारे ठसा उमटवणार

## लोटे 'रोटरी'च्या नूतन अध्यक्षा सोनाली रहाटे यांची ग्वाही, नूतन कार्यकारिणी पदग्रहण सोहळा

| त. भा. प्रतिनिधी

**खेड :** समाजसेवा ही केवळ एक कृती किंवा कर्तव्य नाही तर तो एक संस्कार आणि जीवन जगण्याचा मार्ग आहे. यामुळे समाजकार्यातून जनसेवेवर भर देत लोकाभिमुख उपक्रमांद्वारे कार्याचा ठसा उमटवण्यासाठी कटिबद्ध राहाणार असल्याची ग्वाही लोटे रोटरी क्लबच्या नूतन अध्यक्षा सोनाली रहाटे यांनी दिली.

लोटे रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी सोनाली रहाटे, सचिवपदी मिहीर वारणकर तर खजिनदारपदी संतोष ठसाळे यांची निवड करण्यात आली आहे. नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण




**लोटे : रोटरी क्लबच्या नूतन अध्यक्षा सोनाली रहाटे यांचा सन्मान करताना सुहास जोशी. सोबत अविनाश पालशेतकर, सुभाष रहाटे आदी.**

समारंभ लवेल येथील पद्मश्री अण्णासाहेब बेहेरे विद्यालय येथे पार पडला. यप्रसंगी त्या बोलत होत्या. सामाजिक कार्यासाठी योग्य दिशा आणि प्रामाणिक इच्छाशक्ती असेल तर वैयक्तिक पातळीवर खूप काही करू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

कोणत्याही भौतिक सुखापेक्षा एखाद्या गरजूच्या चेहऱ्यावर आपल्यामुळे आलेले हसू पाहण्यात जे समाधान मिळते ते सर्वोच्च असते. यामुळे गरजू अन् उपेक्षित घटकांसाठी विधायक उपक्रम राबवून नजरेत भरणारी कामगिरी करण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याची ग्वाही दिली. नूतन सेक्रेटरी मिहिर वारणकर, खजिनदार संतोष ठसाळे यांनीही मनोगते व्यक्त केली. याचवेळी भारत सुवर्णपदक विजेती तन्वी रेडीज हिचा सत्कार करण्यात आला.

यप्रसंगी रोटरी क्लबचे डिस्ट्रीक गव्हर्नर सुहास जोशी, सहाय्यक गव्हर्नर अविनाश पालशेतकर, माजी अध्यक्ष संदीप सुर्वे, अनंत कोळवणकर, मिहिर वारणकर, सुभाष रहाटे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन संकेत देवरुखकर यांनी केले.

## गुणगौरव

# सन्मान सुवर्णपदक विजेतीचा..!




लोटे : रोटरी क्लबच्यावतीने भारत सुवर्णपदक विजेती तन्वी रेडीज हिचा सत्कार करताना डिस्ट्रीक गव्हर्नर सुहास जोशी, सोबत अध्यक्षा सोनाली रहाटे व पदाधिकारी.